# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2015-2017

**YEAR : 40)** **15th June 2015 ( No. of Pages 12 )** **( No : 07**

# उच्च शिक्षण संचालक व उच्च शिक्षण सहसंचालकांना किमान वाचता आले पाहिजे व एखादे वाक्य लिहिताही आले पाहिजे !

## "The Respondents shall release monetary benefits accruable to the petitioners within a period of twelve weeks from today"

### *या लहानशा वाक्याचा अर्थ समजायला किती महिने लागतील ?*

**प्रा. बी. टी. देशमुख,**

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष

**१.** भारताच्या मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १८ नोव्हेंबर २०१३ रोजी पुढीलप्रमाणे अंतरिम आदेश पारित केलेत. "We are of the view that following the UGC Notification/Letter Dt. 04.11.2008, those teachers who have not passed NET-SET examination but who have completed six years of service as on that date should be entitled to the benefits of Career Advancement Scheme only for the purpose of pay scales." या गोष्टीला आता १८ महिन्याचा काळ उलटून गेलेला आहे. **हे एकच वाक्य पण बरेच मोठे असल्याने त्या वाक्याचा अर्थ संचालक उच्च शिक्षण किंवा सहसंचालक उच्च शिक्षण यांच्यापैकी कोणालाही अजूनही समजला नाही.**

**२.** मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २१ फेब्रुवारी २०१४ रोजी, सन २०१४ च्या याचिका क्रमांक ११२९ मध्ये दिलेल्या निर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये स्पष्टपणे पुढील प्रमाणे उल्लेख आहे. :- "Perused the order passed by the Supreme Court in Special Leave to Appeal (Civil) No.34118 of 2013, dated 18.11.2013." मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १८ नोव्हेंबर २०१३ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अवलोकन केल्यानंतरच मा. उच्च न्यायालयाने हे आदेश पारित केलेले होते. त्याच आदेशाच्या परिच्छेद ६ मध्ये मा. उच्च न्यायालयाने "The Respondents shall release monetary benefits accruable to the petitioners in terms of above, as expeditiously as possible, preferably within a period of twelve weeks from today." असे आदेशीत केले होते. **या गोष्टीनंतर आता १५ महिन्यांचा काळ उलटून गेला पण या एका लहानशा वाक्याचा अर्थ त्यांना कोणालाही अजूनही कळलेला नाही.**

**३.** खुद्द महाराष्ट्र शासनाने या सर्व संचालकांना व सहसंचालकांना दिनांक ११ नोव्हेंबर २०१४ रोजी एक आदेश पाठवून स्पष्ट शब्दात "**मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि.१८/११/२०१३ चे आदेश अद्याप कायम आहेत.** तसेच मा.उच्च न्यायालयाच्या उक्त दि. ११ एप्रिल, दि. ०६ मे व दि. ०७ मे, २०१४ रोजीच्या आदेशास कोणतीही स्थगिती देण्यात आलेली नाही." असे कळविले त्याच आदेशात पुढे एक वाक्य असे आहे की "**मा. उच्च न्यायालयाच्या अथवा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशास स्थगिती देण्यात आलेली नसेल तर त्यांची विहित मुदतीत अंमलबजावणी करणे अनिवार्य आहे.**" शासनाने या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना हे कळवून **आता सहा महिने होत आलेले आहेत. पण या एका लहानशा वाक्याचा अर्थ त्यांना कोणालाही अजूनही कळलेला नाही.**

**४.** त्यानंतर महाराष्ट्र शासनाने स्पष्ट शब्दात या आदेशान्वये "वर नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता उक्त याचिकामध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार याचिकाकर्त्यांना विशेष अनुमती याचिका क्र. ३४११८/२०१३ मध्ये **मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अधीन राहून CAS चे लाभ अनुज्ञेय करण्यात यावेत.**" असेही आदेशीत केले. "**प्रस्तुत प्रकरणांमधील मा. उच्च न्यायालयाचे आदेश स्वयंस्पष्ट आहेत.** त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून **वरील आदेशाची अंमलबजावणी संबंधित विभागीय सहसंचालक यांच्या स्तरावरून करणे आवश्यक होते.** तथापि, विभागीय सहसंचालक, उ. शि. औरंगाबाद यांनी तशी कार्यवाही न करता संचालक, उच्च शिक्षण यांच्याकडे मार्गदर्शन मागितल्याचे दिसते. तसेच संचालकांनी सुद्धा त्यावर योग्य निर्णय न घेता प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. त्यामुळे **विभागीय सहनिबंधक, उ. शि., औरंगाबाद विभाग, औरंगाबाद व संचालक, उच्च शिक्षण यांनी खुलासा शासनास सादर करावा.**" या शब्दात या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना समज देण्याची वेळ आली तरी त्यांना कोणालाच या वाक्याचे अर्थ समजू नये हे पाहिले म्हणजे समज या शब्दाला सुद्धा लाजेने मान खाली घालावी लागेल.

**५.** प्राथमिक शाळेत अगदी सुरुवातीच्या अवस्थेमध्ये मुलांना भाषेचा परिचय

## Nagpur University Teachers' Association

**MEETING NOTICE : 1**

**DATED : 15.06.2015**

From :
**Dr. A.W.DHAGE**
Secretary, NUTA Sankalp Sahaniwas,
Khare Town, Dharampeth,
Nagpur-444 010

To,
All the members
of the Nagpur University Teachers' Association

Dear members,

I have the honour to inform you that the General Body meeting of the Nagpur University Teachers' Association will be held at 12.00 noon, on the Day and the Date mentioned below.

2. If you propose to move any resolution for the consideration of the General Body, you are requested to send such resolution to me, with a copy to Prof. P.B. Raghuwanshi, President NUTA, Buty Plot, Near Mahajan wadi, Rajapeth, Amravati 444 601 within a period of 10 days from the date of the posting of this Bulletin.

3. It will not be possible to include in the agenda, resolutions received after the due date. So please make it convenient to send such resolutions, if any, within the stipulated time. The place of the meeting will be intimated to you alongwith the agenda.

Thanking you.

Yours faithfully
**Sd/- Dr.A.W.DHAGE,**
Secretary, NUTA.

***Time, Day and Date of the Meeting***
***12.00 Noon on Sunday, the***
***11th October, 2015***

करून देतांना "जगन नमन कर" "मगन भजन कर" "पवन सरळ बस" "छगन लवकर ऊठ" "मदन घर बघ" अशा लहान-लहान जोडाक्षरे नसलेल्या व समजायला सोप्या असलेल्या वाक्यांनी शिकवायला सुरुवात केली जाते. मी खाली नमूद केलेल्या पाच-सात वाक्यांमध्ये काही जोडाक्षरे असतीलही तरी उच्च शिक्षण संचालक किंवा सहसंचालक पदावर आरूढ असलेल्या महनीय व्यक्तींना त्या वाक्यांचा अर्थ त्यामुळे अजूनही समजला नाही असे समजणे फारच नासमजपणाचे होईल. ती वाक्ये पुढीलप्रमाणे :-

**(१) Those teachers who have not passed NET/SET examination but who have completed six years of service as on that date should be entitled to the benefits of career advancement scheme.**

**(२) The Respondents shall release monetary benefits accruable to the petitioners within a period of twelve weeks from today.**

**(३) मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि. १८/११/२०१३ चे आदेश अद्याप कायम आहेत.** तसेच मा. उच्च न्यायालयाच्या उक्त दि. ११ एप्रिल, दि. ०६ मे व दि. ०७ मे, २०१४ रोजीच्या आदेशास कोणतीही स्थगिती देण्यात आलेली

*( माहितीच्या अधिकारातील कागदपत्रे : पृष्ठ क्रमांक २ ते ४ )*

# उच्च व तंत्र शिक्षण विभाग/विशि-१

**प्रस्तुत प्रकरण** याचिका क्र. ३४४८/२०१४, ३३५२/२०१४, व १७०४/२०१४, ३९४/२०१४, १५३४/२०१४, ४१७६/२०१४, ४३३/२०१४ यासंदर्भात **मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत आहे.**

**२. प्रस्तुत प्रकरणाची थोडक्यात वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे :-**

(i) याचिकाकर्त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट-सेट अर्हतेतून दिलेली सूट, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा दिनांक, संबंधित विद्यापीठ व संबंधित सहसंचालक इत्यादींचा तपशील :-

(१) याचिका क्र.: १७०४/१४ मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा दिनांक : ०७/०५/१४ याचिकाकर्त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेली सूट इ.चा दिनांक : २१.०२.०८, २३.०२.१० संबंधित विद्यापीठ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद संबंधित विभागीय सहसंचालक : औरंगाबाद

(२) याचिका क्र. : ३९४/१४ मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा दिनांक : ०७/०५/१४ याचिकाकर्त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेली सूट इ.चा दिनांक : २१.०२.०८, २३.०२.१० संबंधित विद्यापीठ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद संबंधित विभागीय सहसंचालक : औरंगाबाद

(३) याचिका क्र. : ३४४८/१४ मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा दिनांक : ०६/०५/१४ याचिकाकर्त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेली सूट इ.चा दिनांक : ०२.०६.०९, २२.०३.१०, २६.०३.१०, २६.०८.१०, २६.०८.११ संबंधित विद्यापीठ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद संबंधित विभागीय सहसंचालक : औरंगाबाद

(४) याचिका क्र. : ३३५२/१४ मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा दिनांक : ११/०४/१४ याचिकाकर्त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेली सूट इ.चा दिनांक : २१.०२.०८, २३.०२.१० संबंधित विद्यापीठ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद संबंधित विभागीय सहसंचालक : औरंगाबाद

(५) याचिका क्र. : १५३४/१४ मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा दिनांक : ०७/०५/१४ याचिकाकर्त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेली सूट इ.चा दिनांक : २१.०२.०८, २३.०२.१० संबंधित विद्यापीठ : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संबंधित विभागीय सहसंचालक : नांदेड

(६) याचिका क्र. : ४१७३/१४ मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा दिनांक : ०७/०५/१४ याचिकाकर्त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेली सूट इ.चा दिनांक : २१.०२.०८, २३.०२.१० संबंधित विद्यापीठ : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संबंधित विभागीय सहसंचालक : नांदेड

(७) याचिका क्र. : ४३३/१४ मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा दिनांक : ०७/०५/१४ याचिकाकर्त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेली सूट इ.चा दिनांक : २१.०२.०८, २३.०२.१० संबंधित विद्यापीठ : उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव संबंधित विभागीय सहसंचालक : जळगांव

(ii) सदर याचिकांमधील अध्यापकांनी विशेष अनुमती याचिका क्र. ३४११८/२०१३ (महाराष्ट्र शासन वि. श्रीमती आशा बिडकर व इतर) मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. १८/११/२०१३ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे त्यांनाही CAS चे लाभ देण्यात यावे, अशी विनंती उक्त याचिकांमध्ये केलेली होती.

**३.** (i) मा. उच्च न्यायालयाच्या उक्त आदेशांमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या विशेष अनुमती याचिकेच्या निर्णयाच्या अधीन राहून विशेष अनुमती याचिका क्र. ३४११८/२०१३ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.१८/११/२०१३ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे **याचिकाकर्त्यांना सुद्धा CAS चे लाभ अनुज्ञेय करण्यात यावेत असे आदेश दिले आहेत.**

(ii) मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशामध्ये उक्त नमूद केलेल्या ७ याचिकांपैकी क्र. ३४४८/२०१४, क्र. ३५५२/२०१४ क्र. १७०४/२०१४, क्र. ३९४/२०१४ या ४ याचिकांसंदर्भातील आदेशाची अंमलबजावणी विभागीय सहसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद तसेच उर्वरित ३ पैकी क्र. १५३४/१४ व क्र. ४१७३/१४ या याचिकांसंदर्भात विभागीय सहसंचालक, नांदेड व क्र. ४३३/१४ विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगांव यांचेशी संबंधित आहे. वरील चार याचिकांच्या निर्णयाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होऊ नये म्हणून योग्य ते आदेश/मार्गदर्शन होण्याबाबत विभागीय सहसंचालक, औरंगाबाद विभाग यांनी संचालकांना विनंती केली आहे व संचालक (उच्च शिक्षण) यांनी त्यांच्या दि. १३ ऑक्टोबर, २०१४ च्या पत्रान्वये शासनाकडून आदेश/मार्गदर्शन मिळण्याबाबत विनंती केली आहे. तसेच सरकारी वकिलांनी त्यांच्या **दि. १० ऑक्टोबर, २०१४ च्या पत्रान्वये मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची पूर्तता करण्याबाबत संचालक व विभागीय सहसंचालक, औरंगाबाद यांना कळविले आहे.**

(iii) मा. उच्च न्यायालयाच्या उक्त दि. ११ एप्रिल, ६ मे व ७ मे, २०१४ च्या आदेशांची अंमलबजावणी करणे अनिवार्य आहे.

**४.** वर नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता **खालील बाबी स्पष्ट होतात.**

(i) याचिका क्र. ११४७७/२०१० मध्ये मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद यांनी बिगर नेट-सेट अध्यापकांना नियुक्तीच्या दिनांकापासून सेवा ग्राह्य धरून CAS चे लाभ अनुज्ञेय करण्यात यावेत असा निर्णय दि. ०१/०८/१३ च्या आदेशान्वये दिलेला आहे.

(ii) सदर आदेशाविरुद्ध शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात SLP दाखल केली असून सदर SLP मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. ०४/११/२००८ रोजीच्या पत्रान्वये नेट-सेट मधून सूट दिलेली आहे. या दिनांकास ज्या अध्यापकांची सेवा ६ वर्षे पूर्ण झालेली आहे त्यांना CAS चे लाभ अनुज्ञेय करण्यात यावेत असे अंतरिम आदेश दिलेले आहेत.

(iii) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. १८/११/२०१३ चे आदेश अद्याप कायम आहेत, तसेच मा. उच्च न्यायालयाच्या उक्त दि. ११ एप्रिल, ६ मे व ७ मे, २०१४ रोजीच्या आदेशास कोणतीही स्थगिती देण्यात आलेली नाही.

(iv) मा. उच्च न्यायालयाच्या अथवा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशास स्थगिती देण्यात आली नसेल तर त्यांची अंमलबजावणी विहित मुदतीत करणे अनिवार्य असल्याबाबत विधी व न्याय विभागाने दि. ०२/०४/२०१४ च्या परिपत्रकान्वये कळविले आहे.

नाही.

**(४)** मा. उच्च न्यायालयाच्या अथवा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशास **स्थगिती देण्यात आलेली नसेल तर त्यांची विहित मुदतीत अंमलबजावणी करणे अनिवार्य आहे.**

**(५)** याचिकाकर्त्यांना विशेष अनुमती याचिका क्र. ३४११८/२०१३ मध्ये **मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अधीन राहून CAS चे लाभ अनुज्ञेय करण्यात यावेत.**

**(६) प्रस्तुत प्रकरणांमधील मा. उच्च न्यायालयाचे आदेश स्वयंस्पष्ट आहेत.**

(v) मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र. ३४११८/२०१३ मध्ये दिलेल्या अंतरिम आदेशानुसार आवश्यक ती कार्यवाही विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांच्याकडून सुरु आहे.

**५.** वर नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता वर नमूद परिच्छेद क्र. २(i) मध्ये नमूद केलेल्या याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार **याचिकाकर्त्यांना CAS चे लाभ अनुज्ञेय करण्याबाबत संबंधित विभागीय सहसंचालक यांनी त्वरीत कार्यवाही करणे आवश्यक आहे.** अन्यथा, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होइल. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत विभागीय सहसंचालक, औरंगाबाद विभाग, नांदेड विभाग व जळगांव विभाग यांना कळविण्यात यावे.

पत्राचा मसुदा पृ.क्र. १९/प.वि. वर मान्यतेसाठीसादर

**६.** तसेच मा. उच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतांना अशा प्रकरणांत मार्गदर्शन मागण्याची आवश्यकता नव्हती. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद व संचालक (उच्च शिक्षण) यांनी पुढील कार्यवाही न करता मार्गदर्शन मागितले आहे. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अंमलबजावणीत कालापव्यय होत आहे. परिणामी याचिकाकर्त्यांकडून अवमान याचिका दाखल होतात. **सबब, याबाबत विभागीय सहसंचालक, औरंगाबाद तसेच संचालक (उच्च शिक्षण) यांचेकडून खुलासा मागविण्यात यावा.** तसेच उर्वरित प्रकरणांत विभागीय सहसंचालक, नांदेड विभाग व विभागीय सहसंचालक, जळगांव विभाग यांनी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही केली किंवा कसे याबाबतची माहिती प्राप्त करून घेण्यात यावी व अद्याप कार्यवाही सुरु केलेली नसल्यास त्यांच्याकडूनही त्याबाबत खुलासा मागविण्यात यावा.

**७.** प्रसंगतः असे नमूद करण्यात येते की, अशाच स्वरुपाचा प्रस्ताव विभागीय सहसंचालक, जळगांव विभाग यांचेकडून अपील दाखल करण्याबाबत यापूर्वी प्राप्त झाला होता. याबाबतसुद्धा वरीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत. याबाबतची नस्ती अवलोकनार्थ खाली ठेवली आहे.

कक्ष अधिकारी
१/११/१४
उ.स. (विधी) ५/११/२०१४
उ.स. (वि.शि.) ५/११/२०१४

***प्र.स. (उ.व.तं.शि)***

It is better we issue Govt-order in the effect to follow Supreme Court's Judgement dated (see flag). However later F.D. sees the file. In light of above facts, Finance Department can be requested to approve this case.

**EXAMINE & PUT UP.**

*11/11/14* *प्र.स. उ व तं शि वि/विशि-१*

***मा. प्र. स. (उवतंशि) यांच्या उक्त टिप्पणीस अनुसरून सादर***

२. प्रस्तुत नस्तीवरील याचिकांमधील निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम निर्णयाच्या अधीन राहून अंमलबजावणी करण्याची कार्यवाही असल्यामूळे सद्यःस्थितीत वित्त विभागाच्या मान्यतेची आवश्यकता भासत नाही. अंतिम निर्णयानंतर वि. वि. व वि. व न्या. विभागाच्या सहमतीने पुढील कार्यवाही करण्यात येईल. कृपया उक्त प्रस्ताव मान्य करावा.

कक्ष अधिकारी
११/११/१४

**(७)** मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून **वरील आदेशाची अंमलबजावणी संबंधित विभागीय सहसंचालक यांच्या स्तरावरून करणे आवश्यक होते.**

**६.** जन्मजात निरक्षरता वेगळी, कारण त्यांना खरोखरच वाचता येत नसते व लिहिताही येत नसते. ओढवून घेतलेली परिस्थितीजन्य निरक्षरता वेगळी. केवळ संकुचित हेतूने ज्यांनी आपली लेखणी गुंडाळून ठेवली आहे, सोबतच आपले वाचन बंद ठेवले आहे किंवा जे वाचून न वाचल्यासारखे करताहेत असे हे सहसंचालक व उच्च शिक्षण संचालक यांना आपण उच्च शिक्षण क्षेत्राची किती नासाडी करतो आहोत व यामुळे होत असलेली दुर्गंधी निस्तरायला किती वेळ लागेल? हे लक्षात येऊ नये हे महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण क्षेत्राचे कमालीचे दुर्दैव होय. एवढी मोठी उच्च विद्याविभूषित माणसे उच्च शिक्षण संचालक व सहसंचालकाच्या पदावर आरूढ झालेली असतांना त्यांच्या उच्च विद्याविभूषिततेचा कोणताही सुगंध थोडासुद्धा सुटू नये याची जी काळजी ही माणसे घेत आहेत ते पाहिले म्हणजे महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण क्षेत्रासाठी तो एक मोठाच काळजीचा विषय आहे असे म्हणण्यावाचून गत्यंतर राहत नाही.

**७.** राज्यशासनाला मिळणारे सर्व प्रकारचे उत्पन्न **"राज्याच्या संचित निधी"** मध्येच जमा केले पाहिजे असे घटनात्मक बंधन आहे. राज्याच्या संचित निधी मधून राज्यशासनाला विधानमंडळाने कायदा करून परवानगी दिल्याशिवाय कोणताही खर्च करता येत नाही. अशी परवानगी मिळविण्यासाठी अंदाजपत्रक दरवर्षी विधानमंडळाला सादर केले जाते. अंदाजपत्रकातील रकमांना मान्यता मिळविण्यासाठी विनियोजन विधेयक सादर केले जाते व त्याला मंजुरी मिळाल्यानंतर त्याचे विनियोजन अधिनियमामध्ये रुपांतर होते. अंदाजपत्रक सादर करतांना (१) संचित निधीवर प्रभारित खर्चाच्या रकमा (Expenditure Charged upon the Consolidated Fund of the State) व (२) प्रस्तावित खर्चाच्या इतर रकमा वेगवेगळ्या दाखवाव्या लागतात. यापैकी संचित निधीवरील प्रभारित खर्चावर विधानमंडळामध्ये चर्चा होऊ शकते, मात्र त्या खर्चावर मतदान करता येत नाही. तो खर्च भारताच्या घटनेने राज्याच्या संचित निधीवर लादलेला प्रभारित खर्च असल्याने अंदाजपत्रकाचा तो भाग अमतदेय (Non-Votable) असतो अशी स्पष्ट तरतूद भारतीय संविधानाच्या कलम २०३ मध्ये आहे.

**८.** राज्याच्या संचित निधीवर प्रभारित करण्यात आलेला खर्च असे कोणत्या खर्चाला म्हणावे? ही बाब घटनेच्या कलम २०२ च्या उपकलम ३ मध्ये तपशीलाने

*( माहितीच्या अधिकारातील कागदपत्रे : पृष्ठ क्रमांक १ )*

**डाक नोंद पोच देय : माहिती अधिकार**

***महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग***

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक : मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
क्र.माअअः- २०१५/प्र.क्र.३११/१५/विशि-१दिनांकः- १८ एप्रिल,२०१५

प्रति,
श्री. प्रकाश कृष्णनाथ वाळुंज,
सेंट मेरी स्कूल रोड, अहिल्यानगर, नेवासा, ता. नेवासा,
जि. अहमदनगर, पिन-४१४६०३

**विषय** :- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार माहिती मिळणेबाबत

**संदर्भ** :- आपला दिनांक १६ मार्च, २०१५ चा अर्ज.

महोदय,

आपला संदर्भाधीन दिनांक १६ मार्च, २०१५ चा अर्ज या कार्यासनास दि. १९ मार्च, २०१५ रोजी प्राप्त झाला. त्यास अनुसरून आपण मागणी केलेल्या कागदपत्रांच्या प्रती (एकूण १९ पाने) सोबत जोडल्या आहेत.

२. सदर प्रकरणी अपीलीय अधिकारी श्री. पा. म. ताकटे, उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, विस्तार भवन, ४ था मजला, खोली क्र. ४१८ (विस्तार), मंत्रालय, मुंबई हे आहेत. आपणास अपील करावयाचे झाल्यास आपण ३० दिवसांच्या आत अपीलीय अधिकाऱ्यांकडे अपील करावे, ही विनंती.

आपला
(हर्षवर्धन तु. जाधव)
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव

**सहपत्र** :- वरीलप्रमाणे **प्रत** :- संग्रहार्थ

** AF : P15 **

# डॉ. अरविंद बारहाते यांचे दुःखद निधन

*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे एक ज्येष्ठ नेते व संस्थापक सदस्य डॉ.अरविंद बारहाते यांचे दिनांक २१ मे, २०१५ रोजी दुःखद निधन झाले. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या स्थापनेपासून तर सन १९९२-९३ पर्यंत ते महासंघाच्या कार्यकारी मंडळाचे सातत्त्याने सदस्य होते. महासंघाचे उपाध्यक्षपद सुद्धा त्यांनी अनेक वर्षे भूषविले होते. अनेक वर्षे ते अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या राष्ट्रीय कार्यकारी मंडळाचे सदस्य होते. सन १९७२-७३ पासून तर सन १९९२-९३ पर्यंत जवळ जवळ २० वर्षे 'नुटा'चे सचिव म्हणून त्यांनी अत्यंत प्रभावी कामगिरी पार पाडली. त्यांच्या दुःखद निधनामुळे विद्यापीठीय महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक जीवनामध्ये अनेक समस्या असण्याच्या कालखंडात संघटनेचे कणखरपणे नेतृत्व करणारा एक ज्येष्ठ नेता आपल्यातून निघून गेला आहे.* **- संपादक**

नमूद केलेली आहे. अशा खर्चांची संख्या ५ असून ते खर्च पुढीलप्रमाणे आहेत :-

(१) राज्यपालांचे परिलाभ व भत्ते आणि त्यांच्या पदासंबंधीचा खर्च;

(२) विधानसभेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे आणि विधानपरिषद असलेल्या राज्यांच्या बाबतीत, विधानपरिषदेचा सभापती व उपसभापती यांचेही पगार व भत्ते;

(३) कोणत्याही उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे पगार व भत्ते याबाबतीतील खर्च;

(४) व्याज, कर्जनिवारणनिधि-आकार व विमोचन आकार यासुद्धा, ज्यांच्याबद्दल राज्य दायी आहे असे ऋण-आकार आणि कर्जाची उभारणी आणि ऋणाचे प्रबंधन व विमोचन यांच्या संबंधीचा अन्य खर्च;

(५) **कोणत्याही न्यायालयाचा किंवा लवाद अधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा निवाडा याची पूर्ती करण्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही रकमा व त्यापोटी होणारा कोणताही खर्च;**

याशिवाय "जो खर्च याप्रमाणे प्रभारित असल्याचे या संविधानाद्वारे अथवा राज्य विधानमंडळाने कायद्याद्वारे घोषित केले असेल असा अन्य कोणताही खर्च" सुद्धा त्यामध्ये येऊ शकेल. "अंदाजपत्रकापैकी जेवढा भाग राज्याच्या एकत्रित निधीवर प्रभारित असलेल्या खर्चाशी संबंधित असेल तेवढा भाग विधानसभेच्या मतास टाकला जाणार नाही," अशी स्पष्ट तरतूद घटनेच्या कलम २०३ (१) मध्ये आहे.

**९.** "कोणत्याही न्यायालयाचा किंवा लवाद अधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा निवाडा याची पूर्ती करण्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही रकमा व त्यापोटी होणारा कोणताही खर्च" हा भारतीय संविधानातील तरतुदीनुसार राज्याच्या संचित निधीवर प्रभारित खर्च असतो. अंदाजपत्रकाचा तो भाग अमतदेय असतो. हे आमच्या संचालकांना व सहसंचालकांना निश्चितच ठाऊक असणार. हे ठाऊक असतांना, मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असतांना, मा.उच्च न्यायालयाचे आदेश असतांना, शासनाने आदेश दिलेले असतांना, गेले १५-२० महिने हे सर्व सहसंचालक व संचालक हात गुंडाळून का बसले आहेत? हे समजणे कठीण आहे. एखाद्या सहसंचालकाच्या अखत्यारीत उपलब्ध असलेल्या किंवा नसलेल्या निधीचा प्रश्न हा वेगळा आहे. निधीचा विषय बाजूला ठेवला तरी **मा. सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी निधीची आवश्यकता नसलेले प्रस्ताव मान्यतेचे एक वाक्य लिहिण्यासाठीचे धैर्य या सहसंचालकांमध्ये व संचालकांमध्ये असू नये हे उच्च शिक्षण क्षेत्राचे केवढे मोठे दुर्दैव होय.** या लेखाच्या मथळ्यामध्ये "उच्च शिक्षण संचालक व उच्च शिक्षण सहसंचालकांना किमान वाचता आले पाहिजे व एखादे वाक्य लिहिताही आले पाहिजे" ही जी शब्दरचना वापरलेली आहे ती या दुर्दैवाच्या पोटीच होय.

**१०.** "वरिष्ठांचे आज्ञापालन" वगैरे भावना या संचालक, सहसंचालक मंडळींच्या मनामध्ये असतील तर त्यात काही अयोग्य नाही, पण शेवटी वरिष्ठ कोण? याचाही उजेड ज्याचा त्यालाच पडला पाहिजे. भारताची घटना वरिष्ठ? सर्वोच्च व उच्च न्यायालय वरिष्ठ? शासनाचा लेखी आदेश वरिष्ठ? की एखाद्या कक्ष अधिकाऱ्याने, अवर सचिवाने किंवा उपसचिवाने "सोडलेल्या तोंडी कानफुसक्या" वरिष्ठ? हे सुद्धा या मंडळींना कळू नये ही अत्यंत चिंतेची बाब आहे. सहसंचालक किंवा संचालक या किंवा तत्सम उच्च पदावर बसणाऱ्या व्यक्तींनी हे सतत ध्यानात ठेवले पाहिजे की त्या पदावरील सेवाकाळात असामान्य धैर्य दाखविण्याचे अलौकिक क्षण मोजकेच असतात. बाकी मग सारा सेवाकाळ 'रूटीन'च असतो. ते मोजके क्षण ज्यांनी पकडले ते आपला ठसा उमटवून जातात. असा ठसा उमटविण्याचा अभूतपूर्व क्षण या मंडळींच्या हातून निसटलेला आहे. भ्रष्ट वरिष्ठांच्या आज्ञांची काळजी करण्यात त्यांचा वेळ निघून गेला. कायदे व नियमांना धरून कार्य करणाऱ्या मुंबई विद्यापीठाच्या एका आदरणीय माजी कुलगुरुंनी आपल्या धिरोदात्त वर्तनाचा असा काही परिचय दिला होता की आठ दिवसात राज्याच्या मुख्यमंत्र्यांना राजीनामा देऊन घरी जावे लागले व पंधरा दिवसात राज्याच्या राज्यपालांना राजीनामा देऊन आंध्रप्रदेशात परत जावे लागले. भारताच्या घटनेचा, सर्वोच्च न्यायालयाचा, उच्च न्यायालयाचा, शासनाचा एवढा पाठिंबा असतांना सहसंचालक व संचालक जे वर्तन करीत आहेत ते अत्यंत केविलवाणे आहे. **एखादा दुसरा मा. सहसंचालक याला अपवाद आहे एवढीच काय ती त्यातल्या त्यात आनंद देणारी बाब होय.**

**११.** हे सर्व तपशील आज नमूद करण्याचे कारण असे की दिनांक ११ नोव्हेंबर २०१४ रोजी महाराष्ट्र शासनाने जे आदेश *(P2 NB15)* काढले त्या आदेशाच्या "**नस्ती वरील स्थिती-मंत्रालयीन टिप्पणीसह**" ज्ञात व्हावी म्हणून माहितीच्या अधिकारामध्ये ती माहिती मागवावी असा निर्णय महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या स्तरावर घेण्यात आला होता. या कामासाठी दोन घटक संघटनांकडे जबाबदारी सोपविण्यात आली होती. महासंघाच्या अध्यक्षांनी व 'पुक्टो'ने या कामी प्रभारी प्राध्यापक म्हणून प्रा. प्रकाश वाळुंज यांच्यावर जबाबदारी सोपविली होती. प्रा. प्रकाश वाळुंज यांनी हे कार्य पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज सादर केला होता. *(P80 NB15)*

**१२.** प्रा. प्रकाश वाळुंज यांनी विहित नमुन्यामध्ये केलेल्या या अर्जाच्या परिच्छेद ३ नुसार जी माहिती मागितली होती ती शब्दशः पुढीलप्रमाणे :- "(३) **आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील** :- महाराष्ट्र शासनाचे पत्र (तात्काळ) क्र. न्यायप्र.२०१४/प्र.क्र.४७४/१४/वि.शि-१, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

---

जोडपत्र - अ : (नियम ३ पहा)

### माहिती अधिकार कायदा २००५ खालील अर्ज

प्रति,
माहिती अधिकारी,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२

**(१) अर्जदाराचे पुर्ण नाव** :- श्री. प्रकाश कृष्णनाथ वाळुंज

**(२) पत्ता** :- सेंट मेरी स्कुल रोड, अहिल्यानगर, नेवासा, ता. नेवासा जि. अहमदनगर, पिन - ४१४ ६०३

**(३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील** :- महाराष्ट्र शासनाचे पत्र (तात्काळ) क्र. न्यायप्र.२०१४/प्र.क्र.४७४/१४/वि.शि-१, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दि. ११ नोव्हेंबर २०१४ या पत्राच्या अनुषंगाने खालील माहिती मिळावी :- **(१)** संदर्भ क्र. (१) संचालक, उच्च शिक्षण यांचे पत्र क्र. उशिसं/२०१२/नेट-सेट याचिका/औवि/ट.क्र.४/न्याक ८६१५, दि. १३/१०/२०१४ **(२)** संदर्भ क्र. (२) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद यांचे पत्र क्र. शिसस/उशि/औवि/अनुदान/२०१४/३८५९, दि. १०/१०/२०१४ **वरील संदर्भीय पत्रांच्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाने घेतलेल्या निर्णयांची टिप्पणी सहीत सर्व माहिती, कागदपत्रा सोबत.**

**(४) माहिती संबंधित असलेला कालावधी** :- ....
**पाहिजे असलेल्या माहितीचे वर्णन** :- ....

**(५) आवश्यक माहिती समक्ष अथवा पोस्टाने पाहिजे याबाबत तपशील** :- पोस्टाने, वरील अर्जदाराचे नावे पत्त्यावर, वरील नमूद केलेल्या पत्त्यावर

**(६) पोस्टाने माहिती कशा पद्धतीने पाहिजे** (साध्या पोस्टाने/रजिस्टर पोस्टाने) :- रजिस्टर पोस्टाने

**(७) अर्जदार दारिद्र्य रेषेखाली आहे काय** :- नाही

स्थळ :- नेवासा

**दिनांक** :- १६/०३/२०१५

**अर्जदाराची स्वाक्षरी**
श्री. प्रकाश कृष्णनाथ वाळुंज

** AF : P55 **

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दि. ११ नोव्हेंबर २०१४ या पत्राच्या अनुषंगाने खालील माहिती मिळावी :- **(१)** संदर्भ क्र. (१) संचालक, उच्च शिक्षण यांचे पत्र क्र. उशिसं/२०१२/नेट-सेट याचिका/औवि/ट.क्र.४/न्याक ८६१५, दि. १३/१०/२०१४ **(२)** संदर्भ क्र. (२) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद यांचे पत्र क्र. शिससं/उशि/औवि/अनुदान/२०१४/३८५९, दि. १०/१०/२०१४ **वरील संदर्भीय पत्रांच्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाने घेतलेल्या निर्णयांची टिप्पणी सहीत सर्व माहिती, कागदपत्रा सोबत.**"

**१३.** उच्च शिक्षण विभागातील अवर सचिव व जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १८ एप्रिल, २०१५ रोजीच्या पत्रान्वये (क्र. माअअ :- २०१५/प्र.क्र.३११/१५/विशि-१) ही माहिती प्रा. प्रकाश वाळुंज यांच्याकडे पाठविली असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की "आपला संदर्भाधीन दिनांक १६ मार्च, २०१५ चा अर्ज या कार्यासनास दि. १९ मार्च, २०१५ रोजी प्राप्त झाला. त्यास अनुसरून आपण मागणी केलेल्या कागदपत्रांच्या प्रती (एकूण १९ पाने) सोबत जोडल्या आहेत." सारांश काय, तर माहिती अधिकाऱ्यांनी त्यांच्या स्वतःच्या पत्राला पृष्ठ क्रमांक १ दिलेला असून सोबत "**११ नोव्हेंबर २०१४ च्या शासन आदेशाच्या प्रकरणी नस्तीवरील स्थिती स्पष्ट करणारी मंत्रालयीन टिप्पणी**" समाविष्ट असलेली १९ पृष्ठे सोबत जोडलेली आहेत. अशी एकूण २० पृष्ठे प्राप्त झालेली आहेत व त्यांना १ ते २० असे पृष्ठ क्रमांक दिलेले आहेत. यातील पृष्ठ क्रमांक २ ते ४ या तीन पृष्ठावर ७ परिच्छेदांची ही मंत्रालयीन टिप्पणी असून ती उच्च व तंत्र शिक्षण विभागातील कक्ष अधिकाऱ्यांनी तयार केलेली आहे.

**१४. प्रस्तुत प्रकरण हे कशाबाबतचे आहे?** हे या टिप्पणीच्या पहिल्याच परिच्छेदात पुढील शब्दात नमूद करण्यात आलेले आहे :- "प्रस्तुत प्रकरण याचिका क्र. ३४४८/२०१४, ३३५२/२०१४, व १७०४/२०१४, ३९४/२०१४, १५३४/२०१४, ४१७६/२०१४, ४३३/२०१४ यासंदर्भात **मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत आहे.**" या मंत्रालयीन टिप्पणीच्या परिच्छेद दोनमध्ये **या प्रकरणाची वस्तुस्थिती थोडक्यात खालील प्रमाणे आहे** असे नमूद करून पुढे मा. उच्च न्यायालयाच्या सातही निर्णयामध्ये समाविष्ट असलेल्या याचिकाकर्त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट-सेट अर्हतेतून दिलेली सूट, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा दिनांक, संबंधित विद्यापीठ व संबंधित सहसंचालक इत्यादी बाबतचे तपशील नमूद केलेले आहेत.

**१५.** सदरहू मंत्रालयीन टिप्पणीच्या परिच्छेद ३ मध्ये अगदी सुरुवातीलाच मा. सर्वोच्च व मा. उच्च न्यायालयाचे काय आदेश आहेत याबाबत पुढील तपशील नमूद आहेत :-

"३. (i) मा. उच्च न्यायालयाच्या उक्त आदेशांमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या विशेष अनुमती याचिकेच्या निर्णयाच्या अधीन राहून विशेष अनुमती याचिका क्र. ३४११८/२०१३ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.१८/११/२०१३ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे याचिकाकर्त्यांना सुद्धा CAS चे लाभ अनुज्ञेय करण्यात यावेत असे आदेश दिले आहेत." त्यानंतर औरंगाबादच्या उच्च शिक्षण सहसंचालकांनी व पुण्याहून उच्च शिक्षण संचालकांनी वेगवेगळी पत्रे ऑक्टोबर २०१४ मध्ये पाठवून शासनाचे मार्गदर्शन मागितल्याचे नमूद असून **पुढे लगोलगच सरकारी वकिलांनी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची पूर्तता करण्याबाबत कळविले आहे** असा ही मजकूर या परिच्छेदात आहे. तो पुढील शब्दात :- "वरील चार याचिकांच्या निर्णयाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होऊ नये म्हणून योग्य ते आदेश/मार्गदर्शन होण्याबाबत विभागीय सहसंचालक, औरंगाबाद विभाग यांनी संचालकांना विनंती केली आहे व संचालक (उच्च शिक्षण) यांनी त्यांच्या दि. १३ ऑक्टोबर, २०१४ च्या पत्रान्वये शासनाकडून आदेश/मार्गदर्शन मिळण्याबाबत विनंती केली आहे. तसेच **सरकारी वकिलांनी त्यांच्या दि. १० ऑक्टोबर, २०१४ च्या पत्रान्वये मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची पूर्तता करण्याबाबत संचालक व विभागीय सहसंचालक, औरंगाबाद यांना कळविले आहे.**"

**१६.** सदरहू मंत्रालयीन टिप्पणीच्या परिच्छेद ४ मध्ये पहिलेच वाक्य "**वर नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता खालील बाबी स्पष्ट होतात**" असे असून शासनाला काय काय बाबी स्पष्ट झालेल्या आहेत, त्या या चौथ्या परिच्छेदाच्या उपपरिच्छेदात नमूद केलेल्या आहेत. त्यातील प्रमुख बाबी पुढील प्रमाणे :-

**एक** : "मा. उच्च न्यायालयाच्या अथवा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशास स्थगिती देण्यात आली नसेल तर त्यांची अंमलबजावणी विहित मुदतीत करणे अनिवार्य असल्याबाबत विधी व न्याय विभागाने दि. ०२/०४/२०१४ च्या परिपत्रकान्वये कळविले आहे."

**दोन** : "सदर आदेशाविरुद्ध शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात SLP दाखल केली असून सदर SLP मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. ०४/११/२००८ रोजीच्या पत्रान्वये नेट-सेट मधून सूट दिलेली आहे. या दिनांकास ज्या अध्यापकांची सेवा ६ वर्षे पूर्ण झालेली आहे त्यांना CAS चे लाभ अनुज्ञेय करण्यात यावेत असे अंतरिम आदेश दिलेले आहेत."

*( माहितीच्या अधिकारातील कागदपत्रे:पृष्ठ क्रमांक ५ ते ६ )*

***महाराष्ट्र शासन : शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)***

महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

Web : www.dirhe.org.in : E-mail : www.dhepune.@yahoo.co.in

E-mail : dhecourt@rediffmail.com

फोन नं. ०२०/२६१२२१९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं. ०२०/२६१११११५३

**क्र.उशिसं/२०१२/नेट-सेट याचिका/औवि/टे.क्र.४/न्याक ८६१५**

**दि. १३.१०.२०१४**

प्रति,

मा. प्रधान सचिव,

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

**विषय** :- मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुमती याचिका क्र. ३४११८/२०१३ मध्ये दिनांक १८.११.२०१३ रोजी देण्यात आलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयात दाखल झालेल्या इतर याचिकांवर दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने मार्गदर्शन/आदेश होणे बाबत...

**संदर्भ** :- विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे पत्र क्रमांक शिससं/उशि/औवि/अनुदान/२०१४/३८५९/६० दि. १०.१०.२०१४

उपरोक्त विषयासंदर्भात सादर करण्यात येते की, श्रीमती आशा रामदास बिडकर यांनी नेट-सेट मधून सूट मिळून कॅसचा लाभ मिळणेबाबत मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे याचिका क्रमांक दाखल केली होती. याचिका क्र. ११४७७/२०१० मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्रमांक ३४११८/२०१३ दाखल केली आहे. सदर याचिकेमध्ये दि. १८.११.२०१३ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे अंतरिम आदेश दिलेले आहेत :-

We are of the view that following the UGC Notification/Letter Dt. 04.11.2008, those teachers who have not passed NET-SET examination but who have completed six years of service as on that date should be entitled to the benefits of Career Advancement Scheme only for the purpose of pay scales. According to us such an Interim Order for that limited purpose will meet end of justice.

The impugned orders passed by the High Court will remain stayed subject above.

मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे समान विषयाच्या याचिका दाखल केल्या असून त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. मा. उच्च न्यायालयात दाखल याचिकेची प्रत, त्यामध्ये दिनांक ११.०८.२०१४ रोजी दिलेल्या आदेशाची प्रत, सरकारी वकीलांचे अभिप्राय इत्यादी अनुषंगिक सर्व कागदपत्रे सोबत जोडलेली आहेत.

| अ.क्र. | याचिका क्रमांक | सद्यःस्थिती | आदेश |
|---|---|---|---|
| १ | १७०४/२०१४ | Disposed off | ०७.०५.२०१४ |
| २ | ३९४/२०१४ | Disposed off | ०७.०५.२०१४ |
| ३. | ३४४८/२०१४ | Admitted | ११.०४.२०१४ |
| ४. | ३३५२/२०१४ | Admitted | Interim Order 11.07.2014 |

तरी वरील तक्त्यानुसार चारही याचिकेतील मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची प्रती व मा. सहाय्यक सरकारी वकील श्री. एस. पी. दौंड उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे अभिप्राय यासोबत जोडण्यात आले आहे.

तरी कृपया वरील चार याचिकांमधील निर्णयाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा अवमान होऊ नये म्हणून योग्य आदेश/मार्गदर्शन व्हावे, ही विनंती.

(डॉ. प्र. रा. गायकवाड)<br>
शि. संचालक, उच्च शिक्षण<br>
शिक्षण संचालनालय, म. रा. पुणे-१

**तीन :** "मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि. १८/११/२०१३ चे आदेश अद्याप कायम आहेत, तसेच मा. उच्च न्यायालयाच्या उक्त दि. ११ एप्रिल, ६ मे व ७ मे, २०१४ रोजीच्या आदेशास कोणतीही स्थगिती देण्यात आलेली नाही."

**१७.** सदरहू मंत्रालयीन टिप्पणीच्या परिच्छेद ५ मध्ये स्पष्ट शब्दात मंत्रालयातून कोणते आदेश निर्गमित होणे आवश्यक आहे याबाबतचा मजकूर समाविष्ट आहे. तो पुढील शब्दात :- "मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार याचिकाकर्त्यांना CAS चे लाभ अनुज्ञेय करण्याबाबत **संबंधित विभागीय सहसंचालक यांनी त्वरित कार्यवाही करणे आवश्यक आहे. अन्यथा, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होईल.** त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत विभागीय सहसंचालक, औरंगाबाद विभाग, नांदेड विभाग व जळगांव विभाग यांना कळविण्यात यावे." पाचव्या परिच्छेदाच्या शेवटी सहसंचालक व संचालक उच्च शिक्षण यांना **पाठवावयाच्या आदेशाचा/पत्राचा मसुदा तयार ठेवण्यात आल्याचे नमूद असून तो मसुदा पृष्ठ १९ व २० वर सोबत दाखल आहे.**

**१८.** उच्च शिक्षण विभागाच्या दुर्दैवाने उद्या अवमान याचिका प्रकरणी सहा महिने खडी फोडण्यासाठी तुरुंगात जाण्याची वेळ आलीच तर त्याची झळ मंत्रालयातील कोणालाही बसू नये याची काळजी घेण्यात आली असून त्यापोटीच या मंत्रालयीन टिप्पणीमध्ये परिच्छेद ६ समाविष्ट करण्यात आला असून तो शब्दशः पुढीलप्रमाणे आहे :-

"६. तसेच मा. उच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतांना अशा प्रकरणांत मार्गदर्शन मागण्याची आवश्यकता नव्हती. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद व संचालक (उच्च शिक्षण) यांनी पुढील कार्यवाही न करता मार्गदर्शन मागितले आहे. **त्यामुळे मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अंमलबजावणीत कालापव्यय होत आहे.** परिणामी याचिकाकर्त्यांकडून अवमान याचिका दाखल होतात. सबब, याबाबत **विभागीय सहसंचालक, औरंगाबाद तसेच संचालक (उच्च शिक्षण) यांचेकडून खुलासा मागविण्यात यावा.** तसेच उर्वरित प्रकरणांत

*( माहितीच्या अधिकारातील कागदपत्रे:पृष्ठ क्रमांक ७ ते ८ )*

### *महाराष्ट्र शासन : सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग,*

**(नविन इमारत), देवगिरी महाविद्यालयाजवळ, रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद**

Website :- www.jdheaur.org : E-mail :- jdheaur_2007@rediffmail.com

फोन नंबर :- 0240-2331913 : फॅक्स नंबर :- 0240-2331913

जा.क्र. शिससं/उशि/औवि/अनुदान/२०१४/३८५९/६०

**दिनांक :- १०/१०/२०१४**

प्रति,
मा. शिक्षण संचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००१

**विषय :-** मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुमती याचिका क्रमांक ३४११८/२०१३ मध्ये दिनांक १८.११.२०१३ रोजी देण्यात आलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयात दाखल झालेल्या इतर याचिकांवर दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने मार्गदर्शन/आदेश होणे बाबत...

**संदर्भ :-** (१) मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल याचिका क्रमांक ३९४/२०१४ मधील आदेश (२) मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल याचिका क्रमांक १७०४/२०१४ मधील आदेश (३) मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल याचिका क्रमांक ३४४८/२०१४ मधील आदेश (४) मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल याचिका क्रमांक ३३५२/२०१४ मधील आदेश (५) प्रस्तुत कार्यालयाचे पत्र क्रमांक शिससं/उशि/औवि/अनुदान/२०१४/३८००, दिनांक ०४.१०.२०१४ (६) आपले पत्र क्रमांक उशिसं/२०१२/नेट-सेट याचिका/औवि/टे.क्र.४/न्याक/८४६२, दि. ०७.१०.२०१४ (७) मा. श्री. एस. पी. दौंड, सहा. सरकारी वकील, उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे पत्र क्रमांक WP/SPD/२०१४/८९६३/१४ दिनांक १०.१०.२०१४

माननीय महोदय,

उपरोक्त विषयी प्रस्तुत कार्यालयाच्या संदर्भीय क्रमांक ५ च्या पत्रानुसार एकूण ७ न्यायालयीन प्रकरणांपैकी ५ न्यायालयीन प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुमती याचिका क्रमांक ३४११८/२०१३ मध्ये जोडण्यास परवानगी मिळणे बाबतचा प्रस्ताव शिक्षण संचालनालयाच्या संदर्भीय क्रमांक ३ च्या पत्रानुसार मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय विस्तार भवन मुंबई यांना अग्रेषित करण्यात आला असता सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.श्री विकास तु. कदम, कक्ष अधिकारी यांनी दिनांक ०८.१०.२०१४ रोजी संदर्भीय क्रमांक १ ते ४ च्या एकूण ४ याचिकेत मा. सरकारी वकीलांचे अभिप्रायासह प्रकरण सादर करावे असे कळविलेले आहे.

त्यामुळे संदर्भीय क्रमांक १ ते ४ याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालयाने मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुमती याचिका क्रमांक ३४११८/२०१३ मध्ये दिनांक १८.११.२०१३ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने सदर अनुमती याचिकेच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून निर्णय दिलेला आहे. मा. उच्च न्यायालयाच्या वरील चारही याचिकेतील आदेशाबाबत मा. श्री. एस. पी. दौंड, सहा. सरकारी वकील, उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे अभिप्राय घेण्यात आले असून ते यासोबत जोडण्यात येत आहे. तसेच संदर्भीय एकूण चार याचिकेच्या प्रती, त्यावरील मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या प्रती, मा.सहा. सरकारी वकीलांचे अभिप्राय इ. सर्व कागदपत्रे यासोबत सादर करण्यात येत आहेत.

तरी वरील चार याचिकांमधील निर्णयाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा अवमान होऊ नये म्हणून कृपया पुढील योग्य ते आदेश/मार्गदर्शन व्हावे, ही विनंती.

आपला विश्वासू,
प्र. सहसंचालक, (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

याची एक प्रत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय अग्रेषित करण्यात येत आहे.

*( माहितीच्या अधिकारातील कागदपत्रे:पृष्ठ क्रमांक ९ )*

No. WP/SPD/2014/8963/14

## OFFICE OF THE GOVERNMENT PLEADER

High Court of Judicature of Bombay
Bench at Aurangabad
**Date : 10.10.2014**

To,

**(1)** Director of Higher Education Maharashtra State Pune.

**(2)** Joint Director, Higher Education Aurangabad region, Aurangabad

**Ref :-** Opinion in respect of common order dated 07.05.2014 passed by the Hon'ble High Court Bench at Aurangabad in Writ Petition No. 1704 of 2014 and Writ Petition No. 394 of 2014 and order dated 6th May 2014 in Writ Petition No. 3352 of 2014 and order dated 11th April 2014 in Writ Petition No. 3448 of 2014.

Sir,

In Writ Petition No. 1704 of 2014, Writ Petition No. 394 of 2014, Writ Petition No. 3352 of 2014 and Writ Petition No. 3448 of 2014 the the Hon'ble High Court Bench at Aurangabad has passed Interim Order on dated 7th May 2014, 6th May 2014 and 11th April 2014 respectively as under.

"In view of the notifications dated 21.02.2008 and 23.02.2008 respectively issued by the University Grants Commission, Petitioner, who has not Passed NET-SET examination but who has completed six years of service as on the date, should be entitled to the benefits of Career Advancement Scheme only for the purpose of pay scales.

The above Interim Order shall be subject to final outcome of the Writ Petition as well as decision of the Supreme Court in Special Leave Petition (Civil) No. 34118 of 2013 dated 18.11.2013"

Please do the needful in compliance with the orders passed by the Hon'ble High Court in the above mentioned Writ Petitions.

Thanking You,

Yours faithfully,
(S. P. Daund)
Asst. Government Pleader

विभागीय सहसंचालक, नांदेड विभाग व विभागीय सहसंचालक, जळगांव विभाग यांनी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही केली किंवा कसे याबाबतची माहिती प्राप्त करून घेण्यात यावी **व अद्याप कार्यवाही सुरू केलेली नसल्यास त्यांच्याकडूनही त्याबाबत खुलासा मागविण्यात यावा.**"

**१९.** सात परिच्छेदांची ही मंत्रालयीन टिप्पणी उच्च शिक्षण विभागातील कक्ष अधिकाऱ्यांनी तयार करून १ नोव्हेंबर २०१४ रोजी सादर केली असे दिसून येते. त्यावर उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव व विधी विभागाचे उपसचिव यांनी दिनांक ५ नोव्हेंबर २०१४ रोजी संमतीदर्शक स्वाक्षऱ्या केल्याचे दिसून येते व त्यानंतर ती टिप्पणी प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण यांना सादर झाली. मूळ मराठीमध्ये टंकमुद्रित असलेल्या या ७ परिच्छेदांच्या टिप्पणीवर प्रधान सचिव उच्च शिक्षण यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात इंग्रजीमध्ये त्यांच्या अभिप्रायाची तीन वाक्ये लिहिली आहेत. "सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी व्हावी यासाठी आपण शासन आदेश काढावेत हे जास्त योग्य होय. नंतर वित्त विभागाकडे फाईल अवलोकनार्थ पाठविता येईल. वरील वस्तुस्थिती लक्षात घेता नंतर वित्त विभागाला मान्यतेसाठी विनंती करणे शक्य आहे." मूळ वाक्ये पुढीलप्रमाणे :- "It is better we issue Govt-order in the effect to follow Supreme Court's Judgement dated (see flag). However later F.D. sees the file. In light of above facts, Finance Department can be requested to approve this case." या शब्दात स्वतःचे मत स्वतःच्या हस्ताक्षरात नमूद करून दिनांक ११ नोव्हेंबर २०१४ रोजी शेवटी "Examine & put up" असा शेरा प्रधान सचिवांनी मारल्याचे दिसून येते.

*( माहितीच्या अधिकारातील कागदपत्रे:पृष्ठ क्रमांक १० ते १२ )*

IN THE HIGH COURT OF JUDICATURE OF BOMBAY

BENCH AT AURANGABAD

**WRIT PETITION NO. 1534 OF 2014**

BHUMREDDY VITHALREDDY PULLAGOR AND OTHERS **VERSUS** THE STATE OF MAHARASHTRA AND OTHERS **WRIT PETITION NO. 1704 OF 2014** PRAMILA UDHAVRAO BHAGAT AND OTHERS **VERSUS** THE STATE OF MAHARASHTRA AND OTHERS **WRIT PETITION NO. 4173 OF 2014** DR. DILIP SAMBHAJIRAO PALIMKAR AND ANOTHER **VERSUS** THE STATE OF MAHARASHTRA AND OTHERS **WRIT PETITION NO. 394 OF 2014** DR. BALIRAM VISHWANATH RAKH AND OTHERS **VERSUS** THE STATE OF MAHARASHTRA AND OTHERS **WRIT PETITION NO. 433 OF 2014** VASUDEO SOMAJI PATEL AND OTHERS **VERSUS** UNIVERSITY GRANTS COMMISSION AND OTHERS Advocate for Petitioners : Mr. Pradeep Deshmukh h/f Mr.H.A.Joshi AGP for Respondents : Mrs. V.A.Shinde

**CORAM : S. S. SHINDE & V. K. JADHAV, JJ.**
**Dated: May 07, 2014**

**PER COURT :-**

1. Heard learned counsel appearing for the petitioner. He submits that, facts involved in this petition are similar like in Writ Petition No.9470/2013. Learned counsel for the petitioner submits that all petitioners are appointed and exemption granted to them by U.G.C. In the light of submissions of counsel for the petitioner and this Court in similar petitions passed the order. We are inclined to pass the following order :-

**ORDER**

"1. Rule.

2. Learned AGP waives service of Rule for Respondent State and State authorities.

3. In view of the notifications dated 21.2.2008 and 23.2.2008 respectively, issued by the University Grants Commission, petitioner, who has not passed NET/SET examination but who has completed six years of service as on the date, should be entitled to the benefits of Career Advancement Scheme only for the purpose of pay scales.

4. The respondents shall **release monetary benefits accruable to the petitioner** in terms of above, as expeditiously as possible, preferably within a period of TWELVE WEEKS from today.

5. The above interim order shall be subject to final outcome of the writ petition as well as decision of the Supreme Court in Special Leave Petition (Civil) No.34118/ 2013, dated 18.11.2013."

2. In case statement made by the counsel for the petitioner is not in consonance with the factual assertion, liberty to the counsel for the respondent No.7 to get this matter moved for urgent orders.

( V.K. JADHAV, J. ) ( S.S. SHINDE, J. )

*( P2 NB15 )*

**२०.** उच्च शिक्षण विभागाच्या कक्ष अधिकाऱ्यांनी त्याच दिवशी Examine केले व त्याच दिवशी put up केले. त्यांची टिप्पणी स्वहस्ताक्षरात असून ती पुढीलप्रमाणे आहे :- "**प्रस्तुत नस्तीवरील याचिकांमधील निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम निर्णयाच्या अधीन राहून अंमलबजावणी करण्याची कार्यवाही असल्यामुळे सद्यःस्थितीत वित्त विभागाच्या मान्यतेची आवश्यकता भासत नाही. अंतिम निर्णयानंतर वि. वि. व वि. व न्या. विभागाच्या सहमतीने पुढील कार्यवाही करण्यात येईल. कृपया उक्त प्रस्ताव मान्य करावा.**" त्याच दिवशी Examine झाले. त्याच दिवशी put up झाले. प्रधान सचिवासह सर्व अधिकाऱ्यांची त्याच दिवशी संमती झाली व त्याच तारखेचे (११/११/२०१४) आदेश तयार करण्यात आले. या आदेशावर प्रत्यक्ष तारिख ११ नोव्हेंबर २०१४ असली तरी ते पत्र ४० दिवसानंतर लोकांना कळले. इतके दिवस ते आदेश का दाबून ठेवण्यात आले होते? हा शिक्षकांनी 'सहानुभूतीने' समजून घेण्याचा विषय आहे.

**२१.** सहरहू मंत्रालयीन टिप्पणीच्या नस्तीवर टिप्पणीखाली असलेली जी

*( माहितीच्या अधिकारातील कागदपत्रे:पृष्ठ क्रमांक १३ ते १४ )*

IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY

APPELLATE SIDE, BENCH AT AURANGABAD

**WRIT PETITION NO. 3352 OF 2014**

PRAFUL SAHEBRAO DEORE AND OTHERS **VERSUS** THE STATE OF MAHARASHTRA AND OTHERS.Advocate for Petitioners : Mr.Deshmukh Anand I. AGP for State/ Respondents 1 to 3:Mr.S.S. Tope.

**CORAM : S. S. SHINDE & V. K. JADHAV, JJ.**
**Dated: May 06, 2014**

Heard.

2. Learned Counsel for the petitioner invited our attention to Exh.N at page 84 of the compilation of writ petition and submits that exemption has been granted to the petitioner by UGC. This fact is confirmed by the learned AGP appearing for the State. This Court in similar matters, has already admitted petitions and granted same reliefs.

3. Perused the order passed by the Supreme Court in Special Leave to Appeal (Civil) No.34118 of 2013 dated 18.11.2013.

4. Rule.

5. Learned Counsel for respective respondents waive service of Rule.

6. In view of the notifications dated 21.02.2008 and 23.02.2010, respectively, issued by the University Grants Commission, petitioners, who have not passed NET/SET examination but who have completed six years of service as on the date,should be entitled to the benefits of Career Advancement Scheme only for the purpose of pay scales.

7. The respondents shall **release monetary benefits accruable to the petitioners** in terms of above, as expeditiously as possible, preferably within a period of twelve weeks from today.

8. The above interim order shall be subject to final outcome of the writ petitions as well as decision of the Supreme Court in above referred Special Leave Petition.

**(V.K. JADHAV, J)** **(S.S. SHINDE, J)**

कागदपत्रे महासंघाला प्राप्त झालेली आहेत त्याचे तपशील पुढीलप्रमाणे :- पृष्ठ ५ व ६ वर संचालक उच्च शिक्षण, पुणे यांनी दिनांक १३ ऑक्टोबर, २०१४ रोजी प्रधान सचिव उच्च शिक्षण यांना लिहिलेले पत्र आहे. ज्या पत्रात त्यांनी प्रधान सचिवांना "**तरी कृपया वरील चार याचिकांमधील निर्णयाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा अवमान होऊ नये म्हणून योग्य आदेश/मार्गदर्शन व्हावे, ही विनंती.**" अशी विनंती केली आहे. पृष्ठ ७ व ८ वर सहसंचालक औरंगाबाद यांनी संचालक उच्च शिक्षण पुणे यांना लिहिलेले १० ऑक्टोबर, २०१३ रोजीचे पत्र आहे, ज्यामध्ये त्यांनी संचालकांना "**तरी वरील चार याचिकांमधील निर्णयाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा अवमान होऊ नये म्हणून कृपया पुढील योग्य ते आदेश/मार्गदर्शन व्हावे, ही विनंती.**" अशी विनंती केली आहे.

**२२.** मंत्रालयीन टिप्पणीच्या खालील कागदपत्रामध्ये पृष्ठ ९ वर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये काम करणाऱ्या सरकारी वकिलांनी सहसंचालक औरंगाबाद व संचालक पुणे यांना लिहिलेले १० ऑक्टोबर, २०१४ रोजीचे पत्र असून त्या पत्रामध्ये पुढीलप्रमाणे सूचना केलेली आहे :- "Please do the needful in compliance with the orders passed by the Hon'ble High Court in the above mentioned Writ Petitions."

**२३.** मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक ७ मे, २०१४ रोजी सन २०१४ च्या याचिका क्रमांक १५३४ सोबतच इतरही चार याचिकांचा एकत्रितरित्या दिलेला निर्णय या टिप्पणीखालील पृष्ठ १० ते १२ वर दाखल आहे. या निकालाच्या परिच्छेद ४ मध्ये मा. उच्च न्यायालयाने "4. The respondents shall **release monetary benefits accruable to the petitioner** in terms of above, as expeditiously as possible, preferably within a period of TWELVE WEEKS from today." असे आदेश दिलेले आहेत.

**२४.** पृष्ठ १३ व १४ वर मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक ६ मे, २०१४ रोजी सन २०१४ च्या याचिका क्रमांक ३३५२ मध्ये दिलेला निर्णय दाखल असून त्या निर्णयाच्या परिच्छेद ७ मध्ये पुढील आदेश नमूद आहेत :- "7. The respondents shall **release monetary benefits accruable to the petitioners** in terms of above, as expeditiously as possible, preferably within a period of twelve weeks from today."

**२५.** पृष्ठ १५ व १६ वर मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक ११ एप्रिल, २०१४ रोजी सन २०१४ च्या याचिका क्रमांक ३४४८ मध्ये दिलेला निर्णय दाखल असून त्या निर्णयाच्या परिच्छेद ६ मध्ये पुढील आदेश नमूद आहेत :- "6. The **Respondents shall release monetary benefits accruable to the petitioners** in terms

*( माहितीच्या अधिकारातील कागदपत्रे:पृष्ठ क्रमांक १५ ते १६ )*

IN THE HIGH COURT OF JUDICATURE OF BOMBAY

BENCH AT AURANGABAD

**WRIT PETITION NO. 3448 OF 2014**

SUNIL RAOSAHEB RAUT **VERSUS** THE UNION OF INDIA AND OTHERS Advocate for Petitioner : Mr. S.B. Talekar AGP for Respondents: Mr. G.K.Naik Thigle

**CORAM**
**S. S. SHINDE & V. K. JADHAV, JJ.**
**Dated : April 11, 2014**

PER COURT :

Liberty to add the Management as party Respondent.

2. Perused the order passed by the Supreme Court in Special Leave to Appeal (Civil) No.34118 of 2013, dated 18.11.2013.

3. Rule.

4. Learned Counsel for respective Respondents waive service of Rule.

5. In view of the notifications dated 2.6.2009, 22.3.2010, 23.3.2010, 26.3.2010 and 26.8.2011, respectively, issued by the University Grants Commission, petitioners, who have not passed NET/SET examination but who have completed six years of service as on the date, should be entitled to be benefits of Career Advancement Scheme only for the purpose of pay scales.

6. The **Respondents shall release monetary benefits accruable to the petitioners** in terms of above, as expeditiously as possible, preferably within a period of twelve weeks from today.

7. The above interim order shall be subject to final outcome of the writ petitions as well as decision of the Supreme Court in above referred Special Leave Petition.

8. Liberty to respondents to apply for modification of the order, if deemed necessary.

**(V.K. JADHAV, J.)** **(S.S. SHINDE, J.)**

( P5 NB15 )

*( माहितीच्या अधिकारातील कागदपत्रे:पृष्ठ क्रमांक १७ )*

*Action to be taken when the decision of High Court is adverse to the State and is not stayed by Hon'ble the Supreme Court of India.*

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

**Law and Judiciary Department**

Government Circular No.: 820-2014/Misc./E Branch

MADAM CAMA ROAD, HUTATMA RAJGURU CHOWK MANTRALAYA, MUMBAI - 400032.

**Date: 2nd APRIL, 2014 : CIRCULAR**

1. It is noticed that there is a general perception that filing of appeal/SLP in the Hon'ble the Supreme Court against the judgment and order passed by the Hon'ble the High Court itself Would amount to stay to the execution/implementation of such judgment and order. However, such perception is not legal, proper and correct. When the decision of the Hon'ble the High Court is adverse to the state, the officer and/or the Department concerned should take necessary steps immediately for filing of appeal/SLP against such order of the Hon'ble High Court before the Hon'ble the Supreme Court of India. It is further necessary to take prompt action for obtaining stay to the orders of Hon'ble the High Court.

2. If the appeal/SLP is filed by the State against the order of the Hon'ble the High Court, but no stay is granted to the implementation and enforcement of the order of the Hon'ble the High Court, such orders would have to be implemented failing which the concerned officer/department may face the action for contempt of Court. The order against which no stay has been granted will have to be complied with/implemented subject to the final decision of the Hon'ble the Supreme Court.

3. All the Administrative Departments in Marytralaya are, therefore, requested to ensure that in appropriate cases steps are taken as quickly as possible for filing appeal/ SLP and further efforts are made to obtain stay to the implementation/enforcement of the orders of Hon'ble the High Court.

4. The departments are also requested to bring this circular to the notice of all the officers working therein and their subordinate offices.

This Government circular of Maharashtra Government is available at the website www.maharashtra.gov.in. Reference no.for this is 201404021712156212.This order, has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

**SANGITRAO SHAMRAO PATIL** Digitally signed by sangitrao. Shamrao Patil DN : c=IN, o=Government of Maharashtra, ou=LNJD, postal Code=400 032, st=Maharashtra,cn=sangitrao. Shamrao Patil Date : 2014.04.02 17:13:52+05'30'

Sangitrao. Shamrao Patil

I/c Principal Secretary & R.L.A. to Government

( P101 NB14 )

of above, as expeditiously as possible, preferably within a period of twelve weeks from today."

**२६.** मंत्रालयीन टिप्पणीच्या सोबत असलेल्या कागदपत्रांमध्ये पृष्ठ १७ वर विधी व न्याय विभागाने काढलेले दिनांक २ एप्रिल, २०१४ रोजीचे एक परिपत्रक दाखल असून त्या परिपत्रकामध्ये वित्त विभागाने सर्व विभागांना "It is noticed that there is a general perception that filing of appeal/SLP in the Hon'ble the Supreme Court against the judgment and order passed by the Hon'ble the High Court itself Would amount to stay to the execution/implementation

*(माहितीच्या अधिकारातील कागदपत्रे:पृष्ठ क्रमांक १८)*

***महाराष्ट्र शासन : सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग,***

**(नविन इमारत), देवगिरी महाविद्यालयाजवळ, रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद**

Website :- www.jdheaur.org : E-mail :- jdheaur_2007@rediffmail.com

फोन नंबर :- 0240-2331913 : फॅक्स नंबर :- 0240-2331913

जा.क्र. शिससं/उशि/औवि/अनुदान/२०१४/३९९१

**दिनांक :- २९/१०/२०१४**

प्रति,

मा. विकास तु. कदम,

कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

**विषय :-** मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुमती याचिका क्रमांक ३४११८/२०१३ मध्ये दिनांक १८.११.२०१३ रोजी देण्यात आलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयात दाखल झालेल्या इतर याचिकांवर दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने मार्गदर्शन/आदेश होणे बाबत...

**संदर्भ** :- (१) प्रस्तुत कार्यालयाचे पत्र क्रमांक शिससं/उशि/औवि/अनुदान/२०१४/३८५९, दि. १०.१०.२०१४

(२) आपल्यासोबत दुरध्वनीवर आज दिनांक २९.१०.२०१४ रोजी झालेली चर्चा.

महोदय,

उपरोक्त विषयी प्रस्तुत कार्यालयाच्या संदर्भीय पत्रानुसार प्रस्तुत विभागाच्या खालील याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मार्गदर्शन/आदेश होणे बाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

(१) मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल याचिका क्रमांक १७०४/२०१४ मधील आदेश

(२) मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल याचिका क्रमांक ३९४/२०१४ मधील आदेश

(३) मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल याचिका क्रमांक ३४४८/२०१४ मधील आदेश

(४) मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल याचिका क्रमांक ३३५२/२०१४ मधील आदेश

मा. उच्च न्यायालयाचे आदेश दिनांक ७ मे २०१४ मध्ये खालीलप्रमाणे एकूण पाच याचिकांचा एकत्रित निकाल दिलेला असून त्या सर्व याचिकांचे क्रमांक व सदर याचिका ज्या विभागातील आहे त्या विभागाचे नाव त्यासमोर दर्शविण्यात येत आहे.

| अ.क्र. | याचिका क्रमांक | सदर याचिका ज्या विभागाशी संबंधित आहे त्या विभागाचे नाव |
|---|---|---|
| १ | १५३४/२०१४ | सहसंचालक, उच्च शिक्षण नांदेड विभाग, नांदेड |
| २ | १७०४/२०१४ | सहसंचालक, उच्च शिक्षण औरंगाबाद विभाग, औरंगाबाद |
| ३ | ४१७३/२०१४ | सहसंचालक, उच्च शिक्षण नांदेड विभाग, नांदेड |
| ४ | ३९४/२०१४ | सहसंचालक, उच्च शिक्षण औरंगाबाद विभाग, औरंगाबाद |
| ५ | ४३३/२०१४ | सहसंचालक, उच्च शिक्षण जळगाव विभाग, जळगाव |

वरील पाच याचिकांपैकी फक्त दोन याचिका औरंगाबाद विभागातील असून दोन याचिका नांदेड विभाग व एक याचिका जळगाव विभागाशी संबंधित आहे.

करिता माहितीस्तव सादर.

आपला विश्वासू

प्र. सहसंचालक, (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

of such judgment and order. However, such perception is not legal, proper and correct." असे कळविले आहे. याच परिपत्रकात पुढे असेही नमूद करण्यात आलेले आहे की :- "If the appeal/SLP is filed by the State against the order of the Hon'ble the High Court, but no stay is granted to the implementation and enforcement of the order of the Hon'ble the High Court, such orders would have to be implemented failing which the concerned officer/department may face the action for contempt of Court."

**२७.** टिप्पणीच्या खालील कागदपत्रामध्ये पृष्ठ १८ वर "मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुमती याचिका क्रमांक ३४११८/२०१३ मध्ये दिनांक १८.११.२०१३ रोजी देण्यात आलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयात दाखल झालेल्या इतर याचिकांवर दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने मार्गदर्शन/आदेश होणे बाबत" या विषयावर सहसंचालक उच्च शिक्षण औरंगाबाद यांनी शासनाला लिहिलेले दिनांक २९ ऑक्टोबर, २०१४ रोजीचे पत्र दाखल आहे.

**२८.** पृष्ठ १९ व २० वर दिनांक ११ नोव्हेंबर, २०१४ रोजीचे आदेश दाखल आहेत. त्यामध्ये पुढील महत्त्वपूर्ण आदेश समाविष्ट आहेत :-

**(१) मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि. १८/११/२०१३ चे आदेश अद्याप कायम आहेत.** तसेच मा. उच्च न्यायालयाच्या उक्त दि. ११ एप्रिल, दि. ०६ मे व दि. ०७ मे, २०१४ रोजीच्या आदेशास कोणतीही स्थगिती देण्यात आलेली नाही.

(२) मा. उच्च न्यायालयाच्या अथवा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशास **स्थगिती देण्यात आलेली नसेल तर त्यांची विहित मुदतीत अंमलबजावणी करणे अनिवार्य आहे.**

(३) याचिकाकर्त्यांना विशेष अनुमती याचिका क्र. ३४११८/२०१३ मध्ये **मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अधीन राहून CAS चे लाभ अनुज्ञेय करण्यात यावेत.**

**(४) प्रस्तुत प्रकरणांमधील मा. उच्च न्यायालयाचे आदेश स्वयंस्पष्ट आहेत.**

(५) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून **वरील आदेशाची अंमलबजावणी संबंधित विभागीय सहसंचालक यांच्या स्तरावरून करणे आवश्यक होते.**

मूळ मंत्रालयीन टिप्पणी व त्याखालील ही सर्व महत्त्वपूर्ण कागदपत्रे आज याच अंकात प्रसृत करण्यात आलेली आहेत.

**२९.** "**प्रस्तुत प्रकरणांमधील मा. उच्च न्यायालयाचे आदेश स्वयंस्पष्ट आहेत.** त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून **वरील आदेशाची अंमलबजावणी संबंधित विभागीय सहसंचालक यांच्या स्तरावरुन करणे आवश्यक होते.** तथापि, विभागीय सहसंचालक, उ.शि. औरंगाबाद यांनी तशी कार्यवाही न करता संचालक, उच्च शिक्षण यांच्याकडे मार्गदर्शन मागितल्याचे दिसते. तसेच संचालकांनी सुद्धा त्यावर योग्य निर्णय न घेता प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. त्यामुळे **विभागीय सहनिबंधक, उ.शि., औरंगाबाद विभाग, औरंगाबाद व संचालक, उच्च शिक्षण यांनी खुलासा शासनास सादर करावा.**" या शब्दात ११ नोव्हेंबर, २०१४ च्या आदेशान्वये या उभय अधिकाऱ्यांकडे खुलासा मागण्यात आला आहे.

**३०.** मूळ मंत्रालयीन टिप्पणीच्या परिच्छेद ६ मध्ये पुढीलप्रमाणे उल्लेख आहे :- "तसेच उर्वरित प्रकरणांत विभागीय सहसंचालक, नांदेड विभाग व विभागीय सहसंचालक, जळगांव विभाग यांनी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही केली किंवा कसे याबाबतची माहिती प्राप्त करून घेण्यात यावी व अद्याप कार्यवाही सुरु केलेली नसल्यास त्यांच्याकडूनही त्याबाबत खुलासा मागविण्यात यावा." असे असले तरी प्रत्यक्षात ११ नोव्हेंबर, २०१४ च्या पत्रात मात्र तसा खुलासा मागण्याचा उल्लेख नाही.

**३१.** आता दिनांक ५ मे २०१५ रोजी मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सन २०१४ च्या अवमान याचिका क्रमांक २५२ मध्ये पुढीलप्रमाणे आदेश पारित केलेले आहेत :- "Admittedly, there is no compliance of the order passed by this Court on 21st February, 2014 in Writ petition No. 1129/2014 with connected petitions. The respondents were supposed to comply with the order within six months from the date of order. However, even after 15 months, the said order is not complied with by the respondents. Learned AGP, by way of

last opportunity, prays for time till 15th June, 2015 to comply with the order." याच आदेशात पुढे असेही नमूद करण्यात आलेले आहे की :- "List on 16th June, 2015. We make it clear that in case the said order is not complied with on or before 15th June, 2015, this Court will have no option but to initiate contempt proceedings against the concerned respondents."

**३२.** मा. औरंगाबाद खंडपीठाने सन २०१४ च्या याचिका क्रमांक ११२९ मध्ये नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत दिनांक २१ फेब्रुवारी २०१४ रोजी जो निर्णय दिलेला होता. त्या निर्णयाची अंमलबजावणी न झाल्यामुळे ही अवमान याचिका दाखल झालेली आहे. या मूळ निर्णयाच्या परिच्छेद ६ मध्ये मा. उच्च न्यायालयाने असे आदेशित केले होते की :- "The Respondents shall release monetary benefits accruable to the petitioners in terms of above, as expeditiously as possible, preferably within a period of twelve weeks from today." या संदर्भात हेही लक्षात ठेवले पाहिजे की "release monetary benefits accruable to the petitioners" या शब्दांचे अर्थ मा. सर्वोच्च न्यायालयाने इतर निरनिराळ्या प्रकरणात वेळोवेळी स्पष्ट केलेले आहेत. जसे :-

ACCRUE :- The dictionary meaning of the word "accrue" is "to come as an accession, increment, or produce: to fall to one by way of advantage; to fall due." The income can thus be said to accrue when it becomes due. (Income Tax Act, 1922). M/s. Morvi Industries Ltd. v. Commissioner of Income Tax (Central), Calcutta, AIR 1971 SC 2396 : (1972) 4 SCC 451 : 1972 (1) SCR 970. Dt. 05-10-1971.

ACCRUE OR ARISE :- The word "accrue" or "arise" in Section 4(1) (b) (i) of the Act, means an income accrues or arises when the assessee acquires a right to receive the same. (Income Tax Act, 1922). Commissioner of Income Tax, Madras v. A Gajapathy Naidu, AIR 1964 SC 1653 : (1964) 7 SCR 767 : 1964 (53) ITR 114 : 1964 (2) SCJ 478. Dt. 16-04-1964.

**३३.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्ष व सचिवांनी दिनांक ७ मे,

*( माहितीच्या अधिकारातील कागदपत्रे : पृष्ठ क्रमांक १९ ते २० )*

# महाराष्ट्र शासन

***तात्काळ : क्र. न्यायप्र २०१४/प्र. क्र. ४७४/१४/वि. शि. -१, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२***

## *दिनांक: ११ नोव्हेंबर, २०१४*

प्रति,

(१) संचालक, उच्च शिक्षण, पुणे. (२) प्र. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद/नांदेड/जळगांव विभाग.

**विषय:-** मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद याचिका क्र. ३४४८/२०१४, क्र. ३५५२/२०१४, क्र. १७०४/२०१४ व क्र. ३९४/२०१४ क्र. १४३४/२०१४, क्र. ४१७३/२०१४ व क्र. ४३३/ २०१४ बाबत मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी दिलेल्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत.....

**संदर्भ:-** (१) संचालक, उच्च शिक्षण यांचे पत्र क्र. उशिसं/२०१२/नेट-सेट याचिका/औवि/टे. क्र. ४/न्याक ८६१५, दि. १३.१०.२०१४. (२) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद यांचे पत्र क्र. शिससं / उशि / औवि / अनुदान /२०१४ / ३८५९, दि. १०.१०.२०१४

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन दिनांक १३/१०/२०१४ व दि. १०/ १०/२०१४ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की,

(i) याचिका क्र. ११४७७/२०१० मध्ये मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद **यांनी बिगर नेट/सेट अध्यापकांना नियुक्तीच्या दिनांकापासून सेवा ग्राह्य धरुन CAS चे लाभ अनुज्ञेय करण्यात यावेत असा निर्णय दि. ०१/०८/२०१३ च्या आदेशान्वये दिलेला आहे.**

(ii) सदर आदेशाविरुद्ध शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र. ३४११८/२०१३ दाखल केली असून सदर SLP मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने दि.०४/११/२००८ रोजीच्या पत्रान्वये नेट/सेट मधून सूट दिलेली आहे. या दिनांकास **ज्या अध्यापकांची सेवा ६ वर्षे पूर्ण झालेली आहे, त्यांना CAS चे लाभ अनुज्ञेय करण्यात यावेत असे दि. १८.११.२०१३ रोजी अंतरिम आदेश दिलेले आहेत.**

(iii) याचिका क्र. ११४७७/२०१० मध्ये मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद यांनी **बिगर नेट/सेट अध्यापकांना नियुक्तीच्या दिनांकापासून सेवा ग्राह्य धरुन CAS चे लाभ अनुज्ञेय करण्यात यावेत असा निर्णय दि. १/०८/१३ च्या आदेशान्वये दिलेला आहे.**

(iv) मा. उच्च न्यायालयाचे उक्त दि.११ एप्रिल, दि.०६ मे व दि.०७ मे, २०१४ चे आदेश हे मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.३४११८/२०१३ मध्ये दि.१८/११/२०१३ रोजी दिलेल्या आदेशानुसार आहेत.

(v) **मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि.१८/११/२०१३ चे आदेश अद्याप कायम आहेत.** तसेच मा. उच्च न्यायालयाच्या उक्त दि.११ एप्रिल, दि.०६ मे व दि.०७ मे, २०१४ रोजीच्या आदेशास कोणतीही स्थगिती देण्यात आलेली नाही.

(vi) मा. उच्च न्यायालयाच्या अथवा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशास **स्थगिती देण्यात आलेली नसेल तर त्यांची विहीत मुदतीत अंमलबजावणी करणे अनिवार्य आहे.**

**२.** वर नमुद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता उक्त याचिकामध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार याचिकाकर्त्यांना विशेष अनुमती याचिका क्र. ३४११८/२०१३ मध्ये **मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अधीन राहून CAS चे लाभ अनुज्ञेय करण्यात यावेत.**

**३.** विषयांकीत याचिका क्र. ३४४८/२०१४, क्र. ३५५२/२०१४, क्र. १७०४/२०१४ व क्र. ३९४/२०१४ या ४ याचिका विभागीय सहनिबंधक, उ.शि., औरंगाबाद विभाग, क्र.१५३४/२०१४ व क्र.४१७३/ २०१४ या २ याचिका विभागीय सहनिबंधक, उ.शि., नांदेड विभाग, नांदेड व याचिका क्र.४३३/२०१४ ही याचिका विभागीय सहनिबंधक, उ.शि., जळगांव विभाग, जळगांव यांचेशी संबंधित आहे.

**४. प्रस्तुत प्रकरणांमधील मा. उच्च न्यायालयाचे आदेश स्वयंस्पष्ट आहेत.** त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून **वरील आदेशाची अंमलबजावणी संबंधित विभागीय सहसंचालक यांच्या स्तरावरुन करणे आवश्यक होते.** तथापि, विभागीय सहसंचालक, उ.शि. औरंगाबाद यांनी तशी कार्यवाही न करता संचालक, उच्च शिक्षण यांच्याकडे मार्गदर्शन मागितल्याचे दिसते. तसेच संचालकांनी सुद्धा त्यावर योग्य निर्णय न घेता प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. त्यामुळे **विभागीय सहनिबंधक, उ.शि., औरंगाबाद विभाग, औरंगाबाद व संचालक, उच्च शिक्षण यांनी खुलासा शासनास सादर करावा.**

तसेच उक्त याचिका क्र.१५३४/२०१४ व क्र.४१७३/२०१४ बाबत विभागीय सहसंचालक, उ.शि., नांदेड विभाग, नांदेड व याचिका क्र.४३३/ २०१४ बाबत विभागीय सहसंचालक, उ.शि., जळगांव यांनी कोणती कार्यवाही केली याबाबतची माहिती शासनास तात्काळ सादर करावी.

आपला

(विकास तु. कदम)

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

( P2 NB15 )

२०१५ रोजी एक जाहीर पत्रक *(P62 NB15)* काढून पुढीलप्रमाणे विनंती केली होती. :- "आयुर्वेद व समाजकार्य महाविद्यालयाच्या बाबतीत केवळ शासननिर्णय दाखल करून अवमान याचिकेतून अधिकाऱ्यांनी आपली सुटका करून घेतली व आता त्या दोनही विभागामध्ये 'जुने धंदे' सुरू झालेले आहेत. आमच्या भोवती चकरा मारा, हे कागद आणा, त्यांना भेटायला पाठवा, हे इतक्या लवकर होत असते काय? आम्हाला सर्व पहावे लागेल. हा पारंपारिक कार्यक्रम सुरू झालेला आहे. ती पाळी नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत येणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे असे महासंघाला वाटते व म्हणूनच तातडीने हे पत्रक प्रसिद्ध करीत आहोत. उपरोक्त परिच्छेद ८ व ९ च्या काळजीपूर्वक वाचनानंतर त्यात अंतर्भूत सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अशी विनंती आहे."

**३३.१** त्याच पत्रकाच्या परिच्छेद ९ मध्ये उभय पदाधिकाऱ्यांनी असे नमूद केले होते की :- "वेतनाच्या व वेतन श्रेणीच्या प्रयोजनार्थ CAS चे लाभ अदा करण्याच्या मा. न्यायालयाच्या आदेशाची पूर्तता उपरोक्त दोन अटींची पूर्तता केल्यानंतरच होऊ शकते. काहीतरी एखादे परिपत्रक, सचिवांनी संचालकांना किंवा संचालकांनी सहसंचालकांना लिहिलेले एखादे पत्र किंवा एखादा नवा-जुना शासननिर्णय मा.न्यायालयासमोर ठेऊन अवमान याचिका निकाली काढण्याचा प्रयत्न शासनाकडून हमखासपणे होऊ शकतो, तेव्हा अशा प्रयत्नांपासून सर्व संबंधित याचिकाकर्त्यांनी, संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सावध राहण्याची गरज आहे. अवमान याचिकेबाबत नुसते एखादे परिपत्रक, पत्र, निर्णय समोर ठेऊन याचिका निकाली काढण्याचा शासनातर्फे प्रयत्न झाल्यास, त्याचवेळी कोणत्या महिन्यापासून पूनर्निश्चित वेतनाप्रमाणे वित्तलब्धी अदा केल्या जाईल? व कोणत्या तारखेपर्यंत थकबाकी (Monetary Benefits Accruable) अदा केली जाईल याच्या तारखा मा. न्यायालयाच्या कार्यवृत्तामध्ये नोंद केल्या जाव्यात असा आग्रह धरावा किंवा तोपर्यंत ती अवमान याचिका प्रलंबित ठेवावी, निकाली काढू नये अशी मा. न्यायालयाला विनंती करावी. गरज पडल्यास आयुर्वेद व समाजकार्य महाविद्यालयाचे उदाहरण द्यावे."

**३३.२** मा. सर्वोच्च व मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर सर्व नेट-सेट मुक्त शिक्षकांना ज्या दोन महत्वाच्या उपलब्धी प्राप्त झालेल्या आहेत त्याची माहिती या परिपत्रकाच्या परिच्छेद ७ मध्ये देण्यात आली होती. ती पुढील शब्दात :- "मा. सर्वोच्च न्यायालयाच्या १८ नोव्हेंबर २०१३ च्या अंतरिम आदेशातील "who have not passed NET/SET examination but who have completed six years of service as on the date, **should be entitled to the benefits of Career Advancement Scheme** only for the purpose of pay scales." ही शब्दरचना किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अवलोकनोत्तर मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सन २०१४ च्या याचिका क्रमांक ११२९ मध्ये दिनांक २१ फेब्रुवारी २०१४ रोजी दिलेल्या निर्णयात वापरलेली "The Respondents shall **release monetary benefits accruable to the petitioners**" ही शब्दरचना लक्षात घेतली म्हणजे त्यातून दोन निष्कर्ष स्पष्ट निघतात. ते म्हणजे (१) मा. न्यायालयाने ठरवून दिलेल्या मुदतीत CAS चे लाभ देऊन त्याप्रमाणे पूनर्निश्चित झालेले वेतन लागू करणे, म्हणजेच ते प्रत्यक्षात सुरू होणे व (२) नेमणुकीच्या दिनांकापासून असे वेतन सुरू झाल्याच्या दिनांकापर्यंत CAS लागू केल्यामुळे होणारी थकबाकी त्याच मुदतीच्या आत अदा होणे."

**३४.** मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठापुढे सन २०१४ च्या अवमान याचिका क्रमांक २३८ बाबत झालेल्या घडामोडी लक्षात घेणे आवश्यक आहे. मुळात सन २०१३ च्या याचिका क्रमांक ६६८७ मध्ये मा.उच्च

IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
APPELLATE SIDE, BENCH AT AURANGABAD
**WRIT PETITION NO. 7121 OF 2013**

Mr.V.M.Chate, advocate for the Petitioner. Mr.S.K.Kadam, Asstt. Govt. Pleader for the State. Mr.Alok Sharma, advocate for Respondent No.4.

**CORAM : S.V.GANGAPURWALA & V.K.JADHAV, JJ.**
**Date : 18.11.2014.**

PER COURT :

1. Heard.

2. The issue involved in the present petition is subjudice before the Apex Court, wherein the Apex Court had passed the interim orders granting interim protection.

3. This Court has also admitted many petitions and passed interim orders to that effect.

4. In light of that, Rule.

5. The petitioner shall be entitled for Career Advancement Scheme (CAS) only for the purpose of pay-scale with effect from completion of six (6) years **from the date of appointment.**

6. Mr.Kadam, learned Asstt. Govt. Pleader waives notice of Rule for Respondent Nos.1 to3.

7. Mr.Alok Sharma, learned counsel waives notice of Rule for Respondent No.4.

(V.K.JADHAV,J.) (S.V.GANGAPURWALA,J.)

# महाराष्ट्र शासन

विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर - ४१६ ००१
E-mail : jdhekop@gmail.com court.jdhekop@gmail.com
फोन नं. :- (०२३१) २५३५४००, २५३५४५४ फॅक्स नं. :- (०२३१) २५३५४००

**जा.क्र.विससं/उशि/कोवि/न्याक/८१४**
**दिनांक :- १२/०५/२०१५**

न्यायालयीन प्रकरण/तातडीचे/कालमर्यादा/परिपत्रक :

प्रति,
प्राचार्य,
अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान,
विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये, कोल्हापूर विभाग

**विषय :-** मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे निवडश्रेणी अंतर्गत वेतननिश्चिती, करिअर ॲडव्हान्समेंट स्कीमचे लाभ तसेच नेट-सेट मधून सूट मिळावी याकरिता अधिव्याख्यात्यांनी दाखल केलेल्या याचिकाबाबत

विषयांकित बाबत आपणास कळविण्यात येते की, विषयाधीन प्रकरणातील आपल्या महाविद्यालयातील संबंधित अधिव्याख्याता यांनी निवडश्रेणी अंतर्गत वेतननिश्चिती तसेच नेट-सेट मधून सूट मिळावी याकरिता याचिका दाखल केलेल्या आहेत. संबंधित याचिकादारांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथील याचिका क्र. ११४७७/१० या श्रीमती आशा बिडकर व इतर या प्रकरणाचा आधार घेऊन उपरोक्त याचिका दाखल केलेल्या होत्या. याचिका क्र.११४७७/१० वरील दि. १/८/२०१३ रोजीच्या निकालाचे विरोधात शासनाचे वतीने **मा. सर्वोच्च न्यायालय येथे एसएलपी क्र. ३४११८/१३ (सिव्हील अपील क्र. १०७५९/१३) हा दाखल केलेला होता. सदर एसएलपी वर दि.२५/३/२०१५ रोजी आदेश झालेला आहे. या आदेशात निवडश्रेणी अंतर्गत वेतननिश्चिती तसेच नेट-सेट मधून सूट मिळावी याकरिता दाखल व अंतरिम आदेश झालेल्या सर्व याचिकांवरील झालेल्या निर्णयास स्थगिती देत या सर्व याचिकांची एकत्रित सुनावणी घेणेसाठी व अशा प्रकारच्या याचिकांवर योग्य ती कार्यवाही करणेबाबतच्या २ नोटीस मा. उच्च न्यायालयाने प्रसिद्ध केलेल्या आहेत. सोबत दोनही नोटीसची प्रत पाठवणेत येत आहे.**

तरी विषयांकित बाबत आपल्या महाविद्यालयातील याचिकादारांचेबाबत मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे/नोटीसचे पालन करत त्यांच्या याचिकांबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करावी याबाबत आपण आपल्या स्तरावर संबधीतांना कळवून सदर दोनही नोटीसवर संबंधित याचिकादारांच्या स्वाक्षऱ्या घेऊन नोटीसच्या मूळ प्रती या कार्यालयास त्वरित पाठवून देणेत याव्यात.

(डॉ. राजकुमार कांबळे)
विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

सोबत :- नोटीसप्रती व मा. सर्वोच्च न्यायालय सिव्हील अपील क्र. १०७५९/१३ चा निकाल प्रत

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उ.शि.म.रा. पुणे-१ यांना माहितीसाठी सविनय सादर

** AF : P57 **

न्यायालयाच्या निर्णयाची (मूळ निर्णय) अंमलबजावणी झाली नाही म्हणून ही (C.P. 238/2014) अवमान याचिका दाखल करण्यात आली होती. खरे म्हणजे मूळ निर्णय हा काही W.P. 6687/2013 या एकट्या याचिकेमध्ये झालेला नव्हता तर तो निरनिराळ्या ४ याचिकांमध्ये एकत्रितरीत्या झालेला निर्णय होता. त्या चार याचिका पुढीलप्रमाणे :- (1) W. P. NO. 7421 OF 2013 (2) W. P. NO. 6687 OF 2013(3) W. P. NO. 641 OF 2014(4) W. P. NO. 642 OF 2014. हा निर्णय मा. औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २१ जानेवारी, २०१४ रोजी दिलेला निर्णय आहे. या निर्णयात मा. उच्च न्यायालयाने दिलेले दोन मुख्य आदेश पुढीलप्रमाणे आहेत :-

(1) "In view of the notifications dated 21.02.2008 and 23.02.2010, respectively, issued by the University Grants Commission, petitioners, **who have not passed NET/SET examination but who have completed six years of service as on the date, should be entitled to the benefits of Career Advancement Scheme only for the purpose of pay scales.**"

(2) "The Respondents shall release monetary benefits accruable to the petitioners in terms of above, as expeditiously as possible, preferably **within a period of twelve weeks from today.**"

३४.१ बारा आठवड्याच्या आत CAS मुळे होणारी वित्तलब्धी (Monetary Benefits) शासनाने याचिकाकर्त्यांना अदा करावयाची होती, पण १२ महिन्यांचा काळ उलटून गेला तरी (१) वेतनश्रेणीच्या प्रयोजनार्थ CAS चे लाभ अदा करण्यात आले नाहीत तसेच (२) वित्तलब्धीच्या पोटीची थकबाकीसुद्धा अदा करण्यात आली नाही. असे दिसून येते की ज्या चार याचिकांच्याबाबतीत मूळ निर्णय झाला होता त्यापैकी W. P. NO. 6687/2013 या एका याचिकेतील याचिकाकर्त्यांनी अवमान याचिका दाखल केली. ही अवमान याचिका दिनांक २८ जानेवारी, २०१५ रोजी निकाली निघाली. याचिका निकाली काढतांना मा.खंडपीठाने जो निर्णय दिला त्यातील पहिलेच वाक्य पुढीलप्रमाणे आहे :- "Learned AGP submits that the **proposal is received and is under process.** Further steps are also taken pursuant to the proposal being received regarding benefits of Career Advancement Scheme to the petitioners."

IN THE HIGH COURT OF JUDICATURE OF BOMBAY BENCH AT AURANGABAD

**CONT. PETITION NO. 238 OF 2014 IN WP/6687/2013**

RAGHUNATH PANDHARINATH MAHAJAN AND OTHERS **VERSUS** THE STATE OF MAHARASHTRA AND OTHERS Advocate for Petitioners : Pawar Ajay D. AGP for Respondents State: Mr.K.G.Patil

**CORAM : S. V. GANGAPURWALA & V. L. ACHLIYA, JJ.**

**DATE : 28th January, 2015.**

**P.C. :** Learned AGP submits that the **proposal is received and is under process.** Further steps are also taken pursuant to the proposal being received regarding benefits of Career Advancement Scheme to the petitioners. The respondents shall take decision about the benefits of CAS to the petitioners expeditiously as the proposal is already received by it and the same is being processed, preferably **within four months. Contempt Petition is disposed of.** No costs.

**V.L.ACHLIYA, J.** **S.V.GANGAPURWALA, J.**

३४.२ सहसंचालक हे अत्यंत चांगले व नेकनामदार गृहस्थ असून ते न्यायालयात त्यांच्या वकिलामार्फत जे काही सांगतात त्याप्रमाणे ते निश्चितपणे कृती करतील अशी आपली खात्री असेल तर जे झाले ते उत्तमच झाले असे म्हणावे लागेल. शेवटी आपल्या वकिलांना आपले म्हणून जे काही म्हणणे आपण मांडायला सांगू तेच ते न्यायालयापुढे मांडतील. मा. खंडपीठापुढे आपण जे म्हणणे मांडू त्यावरच व्हावयाचा तो निर्णय होईल. "**proposal is received and is under process.**" एवढ्यावर याचिकाकर्ते समाधानी असतील तर आपल्या वकिलांनी वेगळा आग्रह धरण्याचे कारण नाही व तुमचा काही वेगळा आग्रह नसेल तर मा. न्यायमूर्तींनी वेगळा काही निर्णय देण्याचा प्रश्न दूर राहतो. हे तर नशीबच म्हटले पाहिजे की मा. खंडपीठाने आपणहून या निर्णयात प्रपोजल प्रोसेस करण्यासाठी चार महिन्यांची मुदत घालून दिलेली आहे. ते चार महिने संपलेले आहेत. सहसंचालकांनी त्या दोनही बाबतीत कारवाई पूर्ण केलेली नाही. आता हा दुहेरी अवमान याचिकेचा विषय होतो. सर्व अवमान याचिका दाखलकर्त्यांनी महासंघाच्या अध्यक्ष व सचिवांचे दिनांक ७ मे, २०१५ चे पत्रक काळजीपूर्वक वाचून शक्य असल्यास त्याप्रमाणे आग्रह धरण्याचा विचार करावा.

३५. सर्व सहसंचालक हे आपापल्या क्षेत्रात आपापल्या मनाप्रमाणे राज्य करीत आहेत. आपण आपापल्या संस्थानचे अधिपती आहोत या थाटात प्रत्येकाचे वर्तन आहे. एका सहसंचालकांनी अवमान याचिकेच्या धाकापोटी प्लेसमेंट कमिटीकडून सर्व प्लेसमेंट करवून घेतल्या पण कोणत्या तारखेपासून लाभ द्यावा तेवढी जागा "कोरी" ठेवायला सांगितली. ती तारीख मी नंतर टाकून घेतो असे त्यांचे म्हणणे. याबाबतची मजबूत कागदपत्रे संघटनेने गोळा केली असून योग्यवेळी ती न्यायासनापुढे सादर करण्याचे ठरले आहे. सर्व सहसंचालकांच्या कथा सांगता येणे शक्य नाही पण कोल्हापूरच्या सहसंचालकांनी तर कमालच केली आहे. दिनांक १२ मे, २०१५ रोजी त्यांनी एक परिपत्रक काढून सर्व महाविद्यालयांना पुढीलप्रमाणे कळविले आहे :-

"मा. सर्वोच्च न्यायालय येथे एसएलपी क्र. ३४११८/१३ (सिव्हील अपील क्र. १०७५९/१३) हा दाखल केलेला होता. सदर एसएलपी वर दि.२५/३/२०१५ रोजी आदेश झालेला आहे. या आदेशात निवडश्रेणी अंतर्गत वेतननिश्चिती तसेच **नेट-सेट मधून सूट मिळावी याकरिता दाखल व अंतरिम आदेश झालेल्या सर्व याचिकांवरील झालेल्या निर्णयास स्थगिती देत या सर्व याचिकांची एकत्रित सुनावणी घेणेसाठी** व अशा प्रकारच्या याचिकांवर योग्य ती कार्यवाही करणेबाबतच्या २ नोटीस मा. उच्च न्यायालयाने प्रसिद्ध केलेल्या आहेत. सोबत दोनही नोटीसची प्रत पाठवणेत येत आहे."

अंतरिम आदेश झालेल्या सर्व याचिकांवर मा. सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. असे अधिकृतपणे शासनाच्या एखाद्या अधिकाऱ्याने परिपत्रक काढणे, याचे गांभीर्य त्यांना कळलेले आहे असे वाटत नाही. जो निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिलेलाच नाही तो त्यांनी दिलेला आहे असे अधिकृतपणे शासकीय परिपत्रक काढून कळविणे यात मा. सर्वोच्च न्यायालयाचा अवमान होतो हे त्यांच्या लक्षात आलेले नाही हे एक व दुसरे म्हणजे भारताच्या घटनेप्रमाणे सहसंचालक पदावरील एखाद्या अधिकाऱ्याला "I am the State" च्या थाटात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर अशी कुरघोडी करता येत नाही. हेही त्यांच्या लक्षात आलेले नाही.

*****

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2015-17 (Uploaded on www.nuta.in on 05.06.2015) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 15.06.2015**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

To,...........................................................................

...............................................................................

...............................................................................

...............................................................................